उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी पत्र १०, महिना – डिसेंबर २०१७

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

# बिडे वार्तापत्र

बिडे(कोरकू) = उठा (मराठी)

**उन्नती संस्थेद्वारा प्रसारित**

==================================

## आता तरी देवा मला तारशील का ?

हो, खरंच तशी घटना आहे, वरील वाक्य वाचून विचार पडलात ना ? कारण तसच आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, अंतर्गत राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण - (NAS) : २०१७ (अध्ययन निष्पत्तींचे सर्वेक्षण) नोव्हेंबर २०१७ या महिन्यात पूर्ण भारतात, झाले. यामध्ये इयत्ता - ३ री, ५ वी, आणि ८ वी या वर्गांच्या मुलांची भाषा विषयाची (मुलांना लिहिता वाचता येत का) हे गृहीत धरून चाचणी घेतली गेली, ही चाचणी D. Ed. महविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून पूर्ण भारतात घेतली गेली, त्यात अकोट तालुक्यात काही शाळांमध्ये घेण्यात आली.

माझी पत्नी या प्रक्रीयेमध्ये होती, तिने एका गावात जाऊन मुलांची चाचणी घेतली. तिचे जे काही अनुभव आले ते मी सांगत आहे. तिला जी शाळा देण्यात आली होती, ती माध्यमिक शाळा होती, ज्या गावातील शाळा होती, ते गाव तस मोठं आहे आणि राजकीयदृष्ट्या सुद्धा खूप पुढारलेलं आहे. तिने सांगितलेली गोष्ट तिच्याच शब्दांत -

मुख्याध्यापाकांची परवानगी घेऊन चाचणी सुरु झाली. इयत्ता आठवीतील मुले होती. साधे साधे उतारे होते, आणि ते वाचून त्यातील खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहायची होती. मुलांची परिस्थिती पाहून तर धक्काच बसला, कारण मुलांना न वाचता येत होते, ना लिहिता येत होते. ही प्रक्रिया चालू असतांना, वर्गशिक्षक आणि मराठी विषयाचे शिक्षक वर्गात आले आणि मग आमची खातीरदारी करू लागले. कार्यालयात बसा चहा घ्या, नाश्ता करा. मी पण, त्यांना सांगितले सर, चाचणी झाल्यावर चहा, नाश्ता करू सध्याच नको. त्यावर विनंती करू लागले, की ताई आमच्या या मराठी माध्यमाच्या मुलांना येत नाही. यांच्या बदल्यात इंग्रजी माध्यमाची मुले हुशार आहेत त्यामुळे या मुलांना प्रश्नांचे स्वरूप समजावून सांगू द्या. काही तर गुण मिळायला हवेत ना मुलांना, किमान काठावर तर. नाहीतर शाळा ही अनुदानित आहे, त्यामुळे शाळेवर परिणाम होईल. त्यामुळे आम्हांला मुलांशी बोलू द्या हे सर्व घडत असतांना मनात तर काहूर उठलं होतं कारण मला माझ्या मुलाची काळजी लागली. मुलाला कुठल्या शाळेत टाकावे, त्याचं कसं शिक्षण होईल! इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तर टाकायचं नाही, सरकारी शाळेत टाकायचे तर परिस्थिती अशी.

मग चाचणी घेऊन झाली, मी व माझी सहकारी मुख्याध्यापकांना भेटायला गेलो, तेव्हा मी विषय काढला की सर आठवीतल्या मुलांना तर वाचता सुद्धा येत नाही, त्यावर मुख्याध्यापक म्हणाले, की शिक्षक लक्ष देत नाहीत. प्रत्येकाकडे दहा, पंधरा हजारापर्यंतचे मोबाईल आहेत, गाडी आहे, सर्व आहे. पाहिजे तेव्हा लक्ष देत नाहीत, वेळ असाच घालवतात. मग असं काही आलं, तेव्हा त्यांना कारणे सुचतात. नीट मन लावून शिकवलं तर शिकतात ना मुलं. पण येथे इच्छा कुणाला आहे? सर्व स्वत:च्या मुलांबाबत जागरूक असतील, चांगल्या शाळेत घालतील, वाट्टेल तेवढे पैसे लावतील, का ? कारण आपली मुले चांगलं शिकली पाहिजे. आणि ही मुलं कुणाची? ही शिकली नाही तरी चालेल... अशी परिस्थिती आहे, दोष मुलांचा नाही, तर शिक्षकांमध्ये आहे, त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये आहे.

मग मी त्यांना विचारले की सर तुम्ही तर मुख्याध्यापक आहात, तुम्ही तर हे बदलू शकता. त्यावर मुख्याध्यापक म्हणाले, माझ ते ऐकत नाही, त्यांच्या मनाप्रमाणे वागतात. हे ऐकून मी तर थक्कच झाले. सामान्य कुटुंबातील पालकांनी कुणाकडे आशा करावी?

या चाचणीच्या निकालाची बातमी दैनिक लोकमत वृत्तपत्रात आलेली आहे, ती पुढे दिलेली आहे.

**लोकमत**

**१७३ शाळांमध्ये अचिव्हमेंट सर्वेक्षण : राज्यातून जिल्हा ३० व्या स्थानावर**

# आठवीच्या विद्यार्थ्यांपेक्षा तिसरी, पाचवीतील विद्यार्थी सरस!

**नितीन गव्हाळे ।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला** : केंद्र शासनाच्यावतीने संपूर्ण देशामध्ये इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांची भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र विषयातील गुणवत्ता तपासण्याच्या दृष्टिकोनातून नोव्हेंबर २०१७ मध्ये राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (एनएएस) घेण्यात आले होते. या सर्वेक्षणाचा जिल्हानिहाय निकाल जाहीर करण्यात आला असून, यात अकोला जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांची कामगिरी वाखणण्यासारखी नसली, तरी समाधानकारक असल्याचे दिसून येत आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शाळांमध्ये इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता कशी आहे.

त्यांचे कोणत्या विषयामध्ये किती ज्ञान आहे. हे तपासण्यासाठी विद्या प्राधिकरण पुणेमार्फत राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण करण्यात आले. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थेने अकोला जिल्ह्यातील १७३ शाळांमध्ये हे सर्वेक्षण केले. इयत्ता तिसरी व पाचवीच्या प्रत्येकी ६१ आणि आठवीच्या ५१ शाळांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणादरम्यान इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परिसर अभ्यास (इव्हीएस), मराठी भाषा, गणित विषयाची चाचणी घेण्यात आली. तसेच इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांची परिसर अभ्यास, मराठी भाषा, गणित विषयाची, तर इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांची विज्ञान, मराठी भाषा, गणित आणि सामाजिक शास्त्र विषयातील चाचणी घेण्यात आली. यात इयत्ता तिसरी, पाचवीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता कौतुकास्पद नसली, तरी समाधानकारक असल्याचे दिसून आले.

परंतु जिल्ह्यातील इयत्ता आठवीतील विद्यार्थी गुणवत्तेच्या बाबतीत बरेच माघारले असल्याचे दिसून आले.

त्यामुळे आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे प्रकर्षाने लक्ष देण्याची गरज असल्याचे या सर्वेक्षणाच्या आधारे मिळालेल्या टक्केवारीतून दिसून येत आहे.

## विद्यार्थ्यांची टक्केवारीनिहाय कामगिरी

| विषय | इयत्ता पहिली | इयत्ता पाचवी | इयत्ता आठवी |
|---|---|---|---|
| परिसर अभ्यास | ६२.३८ (टक्के) | ५५.४९ | 00 |
| मराठी भाषा | ६५.२८ | ६१.२८ | ५८.९७ |
| गणित | ५९.४९ | ५२.४५ | ३५.१७ |
| सामाजिक शास्त्र | 00 | 00 | ३५.६७ |
| विज्ञान | 00 | 00 | ३६.५३ |

केंद्र शासनाने शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी विद्या प्राधिकरणांतर्गत जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थेने जिल्ह्यातील १७३ शाळांमधील इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण घेतले. या सर्वेक्षणात तिसरी, पाचवीतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता समाधानकारक आहे. आठवीतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता खालावलेली असून, ही गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.
**- सागर तुपे,**
जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण

Hello Akola
Page No. 4 Jan 22, 2018
Powered by: erelego.com

महाराष्ट्र सरकारने गेल्या महिन्यात राज्यात १३२० शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडवता घडवता मुलांची शाळाच या निर्णयामुळे कशी बंद होतेय याचे आणखी एक उदाहरण...

**लोकमत**

**मालपुरा येथील पालकांची मागणी : अकोलीला मुले जातच नाहीत!**

# शाळा बंदचा निर्णय रद्द करा!


लोकमत न्यूज नेटवर्क

**तेल्हारा** : तेल्हारा तालुक्यातील मालपुरा येथील शाळा राज्य शासनाच्या ० ते ३० पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या निर्णयानुसार बंद करण्याचे जाहीर करण्यात आले. मालपुरा येथील शाळा बंद झाल्याने येथील मुले शाळेत जातच नसल्याने मुलांच्या शैक्षणिक नुकसानासाठी जबाबदार कोण, असा प्रश्न पालक विचारत आहेत.

मालपुरा येथे ९९ टक्के दलित वस्ती आहे. मालपुरा येथील शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी असे पाच पाच वर्ग होते. सदर शाळेत इयत्ता पहिलीमध्ये दोन, इयत्ता दुसरीमध्ये एक, इयत्ता तिसरीत एक, चौथ्या इयत्तेत एक व पाचव्या इयत्तेत एक अशी सहा मुले शिकत होती. या शाळेतील पटसंख्या कमी असल्याने शासनाने येथील शाळा बंद करुन अकोली गावातील शाळेला जोडली. परंतु, अकोली हे गाव दूर आहे. तेथे जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. गावात ऑटो नाहीत. मालपुरा येथील विद्यार्थ्यांना अकोली येथे जाण्यासाठी जंगलातून जावे लागते. यामुळे मागील १८ दिवसांपासून मालपुराच्या शाळेतील सहा मुले शाळेत जात नाहीत. त्यामुळे पालक हतबल झाले आहेत.

हे सर्व पालक शेतमजुरी करीत असल्याने त्यांच्या पाल्याकडे लक्ष देऊ शकत नाहीत. मुले शाळेत जात नसल्याने आता मुलांना शिक्षण द्यावे कसे, असा प्रश्न पालकांना पडला आहे. तरी प्रशासनाने मालपुरा येथील शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करुन ती त्वरित सुरु करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

(तालुका प्रतिनिधी)



मालपुरा येथील मुला-मुलींकरिता समायोजित शाळेत जाण्याची व्यवस्था शासन लवकरच करणार आहे.
-विलास धनाडे,
प्रभारी गटशिक्षणाधिकारी, तेल्हारा.

## मालपुरासाठी रस्त्याची सोय करणार!

◆ मालपुरा गावातील पालक व गावकऱ्यांनी या समस्येच्या सोडवणुकीसाठी आमदार प्रकाश भारसाकळे यांची भेट घेऊन सदर शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करण्याची मागणी केली. या पालकांना आमदार प्रकाश भारसाकळे यांनी मालपुरा येथे जाण्या-येण्यासाठी रस्त्याची सोय उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले.

मालपुरा येथे जाण्या-येण्याकरिता रस्ता नाही. गावात कोणतीही सुविधा नाही आम्ही सर्व पालकांचे पोट शेतमजुरी केल्याशिवाय भरत नाही. तरी शासनाने सदर शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करावा.
**- संतोष चराटे,**
पालक, मालपुरा

Hello Akola
Page No. 2 Jan 22, 2018